श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

मासिक पुस्तक.

वर्ष १० अंक. २ ] वैशाख [ शा. १८५५

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम्



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका

—शंकराचार्य.

संपादकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

# अनुक्रमणिका.

| | पृष्ठें |
|---|---|
| साभार स्वीकार ... ... ... ... ... | १ |
| श्रीरामजयंतीच्या उत्सवाचा अहवाल... ... ... | १—६ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... ... ... ... | ७—९ |
| श्रीरामनवमीउत्सवाच्या जमाखर्चाचा तपशील ... | १०-२२ |
| श्रीसंतकथामृत—अध्याय १२-१३ ... ... | ९३-१०२ |

# विनंति.

ज्यांची शके १८५५ ची वर्गणी अद्यापि आली नाहीं त्यांनी ती पाठविण्याची कृपा करावी. व्ही. पी. नें पाठविण्याची विनंती आल्यास व्ही. पी. करण्यांत येईल. —**संपादक.**

सुप्रसिद्ध श्री. मोरोपंत कविकृत **केकावलि** या भक्तिरसप्रेमामृतनें ओथंबलेल्या काव्यावर कै. रा. ब. दादोबा पांडुरंग यांची "यशोदा पांडुरंगी" टीका जी साठ वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध झाली होती व आजमितीस अत्यंत दुर्मिळ झाली होती तिची दुसरी आवृत्ति छापून तयार झाली आहे. किं. रु. २.

**रा. आ. तर्खड,**

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला कचेरी.**

## श्रीसाईभक्तांस विज्ञप्ति.

कोणाला श्रीसाईमहाराजांबद्दलचे त्यांचे स्वतःचे अनुभव श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध व्हावे म्हणून पाठविण्याचे असतील त्यांनीं ते आमचेकडे पाठविल्यास ते प्रसिद्ध होण्याबद्दल आदरपूर्वक योग्य तो विचार होईल.

**रा. आ. तर्खड,**

— प्रकाशक.

# साभार स्वीकार

कराची येथील सौ. रखमाबाई गुरुजी या प्रेमळ माउलीनें घरोघरी हिंडून श्रीरामनवमीच्या उत्सवाकरितां व कायम फंडाकरितां रु. ४९ वर्गणी जमविली हें मुद्दाम नमूद करण्यासारखें आहे. त्याचप्रमाणें मद्रास रेल्वेवर गुंटाकल शहराचे रहिवासी श्रीसाईभक्त श्रीयुत आत्माराम लाडोबा आरोळकर यांनीं एप्रिल महिन्यांत श्रीकायमफंडाकरितां रु. १५७–१२–० वर्गणी आपल्या स्नेही मंडळीकडून जमविली हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. त्यांनीं श्रींच्या लेंडी बागेसाठीं तरतऱ्हेचीं आंब्यांचीं कलमें पाठवून तीं या प्रदेशांत लागवडीस यावीं हा त्यांचा एक अत्यंत प्रेम व उत्साहपूर्वक यत्न सदोदित चालू आहेच.

**रा. आ. तर्खड,**
संपादक.

# श्रीशालिवाहन शके १८५५ श्रीमुखनाम संवत्सरे

## श्रीरामजयंतीच्या उत्सवाचा अहवाल

या सालीं आलेली जमा व झालेला खर्च याचा तपशीलवार खर्डा पोटीं आहे. यंदा नांदेड, मुखेड, गव्हाण, हिंगोली, माझोड, कळमनुरी, मुंबई, पुणें, अंधेरी, बांद्रा, इंदोर, खामगांव, पंढरपूर, नगर, सोलापूर, बार्शी, गुंटकल, सांताक्रूस, ठाणे, कल्याण, डहाणू, चिचणी, तारापूर, सुरत, बडोदा, अहमदाबाद, कडूस, खेड, अकोला, भुसावळ वगैरे ठिकाणाहून बरेचसे लोक शिर्डीस श्रीसाईमहाराजांच्या दर्शनास आले होते; नेहमीं येणारांपैकीं श्री. गोविंद व्यंकटी महाजन व पापालाल उमरीकर हे कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें येऊं शकले नाहींत.

उत्सवास आरंभ चैत्र शु० ८ पासून झाला व द्वादशीस काला होऊन रामनवमीच्या उत्सवाची समाप्ति झाली. या पांच दिवसांत मिळून ७-८ हजार पान झालें. बाहेर गांवाहून यात्रेच्या निमित्तानें सर्व प्रकारची मिळून ७५-८० दुकानें आली होतीं, या सालीं दुकानें थोडीं कमी आलीं होतीं. यात्रेचा बंदोबस्त सरकारचा तालुकाधिकारी यांनीं उत्तम ठेविला होता. राहत्याचे फौजदार व कोपरगांवचे मामलेदारसाहेब उभयतां हजर होते, त्यामुळें यात्रेंत चोऱ्या वगैरे कांहीं झाल्या नाहींत. पाणी पिण्याच्या विहिरींत सरकारकडून आलेलें औषध टाकण्यांत आलें होतें, त्यामुळें पाणी न विघडतां व रोगराई कांहीं एक न होतां यात्रा निर्विघ्नपणें पार पडली.

उत्सवाच्या पांच दिवसांत बुंदी, शिरा, जिलबी अशीं पक्वान्नें मनमुराद झालीं. कोठीचा बंदोबस्त श्रीमारुती पत्तेवार, बाबा पत्तेवार, बाबू पारशेवार या तिघांनीं उत्तम ठेविला होता, तसेंच पंक्ति वाढण्याचा बंदोबस्त श्री. दिगंबरराव उर्फ नानासाहेब नांदेडकर—श्री. दिगंबरबुवा बसमतकर, श्री. जगंनाथराव हेड-मास्तर राजुरी, श्री. भगवानराव माझोडकर, श्री. रामचंद्र यशवंत मराठे, (विठ्ठलराव) श्री. दत्तोपंत कस्तुरे, श्री. नागोराव उंचेगांवकर, श्री. दत्तोपंत खामगांवकर, श्री. दादासाहेब बरुडकर, श्री. भगवानराव मांजरमकर, श्री. सुभेदार, श्री. पुरुषोत्तम अशा मंडळींनीं चांगला ठेवल्यामुळें अन्नाची नासधूस झाली नाहीं. चैत्र शु० ११ चे दिवशीं गांवच्या व बाहेरगांवच्या तीनचारशें मुसलमान लोकांस त्यांच्या नेहमीच्या विहिरीपाशीं असलेल्या चिंचेखालच्या मशिदीपुढें यात्रा भरली असल्यामुळें श्रीसाईबाबांच्या द्वारकामाई नांवाच्या मशिदीच्या सभामंडपांत साखर शिऱ्याचें जेवण दिलें. त्या जेवणाचा बंदोबस्त मलीकभाई, काशिमभाई, सयदूभाई, हमीदभाई वगैरे मुसलमान मंडळींनीं चांगला ठेवला.

श्रीरामनवमीच्या दिवशीं श्रीमहाराजांच्या समाधीजवळ असलेल्या पादुकांवर रुद्र, पवमानाचा अभिषेक पुणतांबे, पंढरपूर, काशी, कोकमठाणनगर येथील भिक्षुकमंडळींनीं केला. दोनप्रहरीं श्रीरामजन्माचें किर्तन नेहमींप्रमाणें

झालें. नंतर अस्तमानीं काठ्यांची व रथाची मिरवणूक निघाली. त्याचा बंदोबस्त श्री. तात्या पाटील, श्री. बयाजी पाटील, श्री. बामन पाटील, बापूरावनाना, श्री. गबा सुतार यानीं उत्तम ठेविला होता. रात्रीं गांवच्या मुसलमान लोकांनीं संदलची मिरवणुक काढून महाराजांच्या समाधीस चंदन चढविलें; त्यानंतर नेहमीप्रमाणें शोभेचें दारू सुटण्याचें काम प्रेक्षणीय झालें. चैत्र शु० १०च्या दिवशीं मल्लांच्या कुस्त्याचा हगामा फार मोठा व प्रेक्षणीय भरला होता.कुस्त्याही चांगल्या झाल्या. हगाम्याचा बंदोबस्त श्री. तात्या पाटील कोते, श्री. बयाजी पाटील, श्री. रामचंद्र पाटील, श्र. दगडू सोनार, श्री. नारायण लव्हार, श्री. नारायण शेळका, बाळा शिंपी वगैरे मंडळींनीं उत्तम ठेविला होता. हगाम्यास बक्षिस वांटण्याकरितां श्रीसाईबाबांच्या पेटींतून जे पांच दिवसांत पैसे आले ते व कांहीं गांवकरी लोकांनीं वर्गणी करून दिले. संस्थानचे सेक्रेटरी श्री. सुंदरराव दि. नवलकर यांनीं पत्रिका पाठविण्याचें काम उत्तम केलें. या सालीं खामगांवचे वकील श्री. बामन विठ्ठल दातार यांनीं दशमीच्या दिवशीं श्री. भानुदास चरित्रावर उत्तम सुश्राव्य कीर्तन केलें तसेंच एकादशीच्या दिवशीं त्यांचे जोडीदार खामगांवचे ओक वकील यांनींही भरतभेट या चरित्रावर सुश्राव्य उत्तम व आल्हाददायक कीर्तन केलें.एकादशीच्या दिवशीं रात्रीं श्रीच्या पालखीची मिरवणूक निघून भजन, गारुड वगैरे झालें. भजन करण्यास मातुलठाणचे रा. अण्णा पाटील, रा. गंगाराम पाटील, देशपांडे, रा. शिरवलकर वगैरे मंडळींनीं चांगले अभंग व पदें म्हटलीं.

उत्सव झाल्यानंतर केवळ श्रींच्या प्रसादासाठीं म्हणून श्री. नानासाहेब बागडेनगर, श्रीमंत नानासाहेब मिरीकर, श्री. दाजीसाहेब मिरीकर,-श्रीमंत बाबासाहेब मजुमदार, पुणें, श्रीमंत सरदार भाऊसाहेब विंचूरकर, श्रीमंत युवराज सदाशिवराव ऊर्फ भाऊसाहेब पंतसचिव, भोर, श्रीमंतसाहेब निसळनगर अशी मंडळी आली होती; या मंडळींबरोबर एक औंधचे श्री. गजाननराव जोशी नांवाचे प्रख्यात फिडल वाजविणारे आले होते, त्यांनींही श्रीसाईमहाराजांपुढें हजरी दिली. तसेंच खानदेशांतील ह. भ. प.

विश्रामबुवा हेही आले होते; त्यानीं दोन दिवस श्रीपुढें हजेरी दिली. तशीच श्रीमंत भवानराव बनसुडे, महू हेही आपल्या श्रीसांईमहाराजाच्या प्रसादानें झालेल्या मुलांची नांवे ठेवण्यासाठी येथें आले. त्यांनी आपल्या मुलांचीं राम व कृष्ण अशी नांवें ठेविली; असो. परमेश्वर त्यांना व त्यांच्या मुलांबाळांस दीर्घायु करो. तसेच रामनवमीच्या प्रसादासाठीं रावसाहेब डोंगरे पेन्शनर अ. कमिशनर अकोला व मांडवगणे हे उभयतां रामनवमी झाल्यावर येथें आले; व शेष प्रसाद उरला होता. तो सेवन करून समाधान मानलें. मी म्हटले कीं,आतां रामनवमी झाली,आतां प्रसाद राहिला नाहीं.त्यावर रावसाहेब म्हणाले कीं, अजूनपर्यंत रामनवमीस उत्सवाकरितां खरेदी झालेलें सामान सरलें नाहीं, तेथपर्यंत मी हा रामनवमीचाच प्रसाद आहे असें समजतों. असें म्हणून दोनतीन दिवस राहून श्रींस अभिषेक व नैवैद्य करून परत गांवाकडे गेले.

येणेंप्रमाणें असलेली हकीकत श्रीचरणारविंदीं सादर केली आहे. चालू सालीं मुंबईच्या बाजूची वर्गणी श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड व श्री. सुंदरराव दि. नवलकर यांच्या साह्यानें बरीच आली व चालू सालीं खर्चही मागील सालापेक्षां जास्त झाला. सालोसाल आढावा पाहतां प्रत्येक उत्सव जमा-खर्चाच्या मानानें वाढत्या प्रमाणानें होत आहे. आलेल्या बडयाबडया पाहुण्या-राहुळयांचा श्री. बापूराव बोरावके, प्रे. जिल्हालोकलबोर्ड, नगर, यांनीं आपल्या बागेंतील श्रींच्या तर्फे मोसंबी, चिकू, ऊस, रस वगैरे देऊन आदर-सत्कार केला. एकंदरींत चालू सालचा उत्सव श्रींच्या कृपेनें उत्तम तऱ्हेनें पार पडला. असो. ज्यांनीं ज्यांनीं द्रव्यद्वारा सहाय्य केलें, उत्सवास हजर राहून ज्यांनीं अंगमेहनत केली, कांहीं मंडळी उत्सव झाल्यावर उत्सवाच्या प्रसादा-साठींच म्हणून आली, त्या सर्वत्र मंडळींचें त्यांच्या मुलांबाळांसह इभ्रतीचें व आरोग्याचें समर्थांनी कृपाकटाक्षानें अवलोकन करून रक्षण करावें. आम्ही सर्व मंडळी महाराजांची लेंकरें आहोंत; तेव्हां आमचें रक्षण करणें समर्थांकडे आहे. आमच्या हातून जाणून न जाणून विकारवश होऊन ज्या कांहीं चुका अगर अपराध झाले असतील त्यांची महाराजांनीं अत्यंत कृपाळु होऊन माफी

करावी, अशीच सर्वांच्या तर्फे आपल्या पवित्र चरणापाशीं नम्र विनंती करीत आहें. असो. अशीच सालोसाल दासाच्या हातून सेवा घेत जावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पुंडलीक वरदे हरि विठ्ठल ॥ सीताकांत:स्मरण जयजयराम ॥ पार्वतीपते हरहर महादेव ॥ श्रीसमर्थ रामदास ज्ञानेश्वर तुकाराम महाराजकी जय ॥ श्रीसद्गुरु साईबाबा वामनशास्त्रीमहाराज की जय ॥

सकल संताचा चरणरज

**दासगणू**

श्रीयुत संपादक श्रीसाईलीला,

सा. न. वि. वि. खालील श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळासंबंधीचे नियम आपल्या वाचकमंडळीच्या माहितीकरितां प्रसिद्ध कराल अशी आशा करितों.

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानच्या भक्तमंडळासंबंधींचे नियम:—

१ सदरील भक्तमंडळाचे तीन वर्ग केले जातील. ते येणेंप्रमाणें:—

(१) आश्रयदाते; (२) तहाहयात वर्गणीदार; (३) सामान्य वर्गणीदार.

२ ज्या भक्तांकडून ( " भक्त " शब्दांत पुरुषभक्त व स्त्रीभक्त–दोहोंचाही समावेश होतो असें समजावें. ) संस्थानच्या कायम फंडांत पांचशें रुपये किंवा त्याहून अधिक रक्कम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा अथवा पोस्टाचीं कॅशसर्टिफिकिटें अथवा म्युनिसिपल बॉंड अथवा पोर्टट्रस्ट बॉंड आले असतील त्यांचा समावेश " आश्रयदाते " या वर्गांत होईल.

३ ज्या भक्तांकडून संस्थानच्या कायम फंडांत शंभर रुपये किंवा त्याहून अधिक ( पण पांचशेंहून कमी ) रक्कम अथवा त्या किंमतीच्या सरकारी नोटा

अथवा म्युनिसिपाल बॉंड अथवा पोर्टट्रस्ट बॉंड आले असतील त्यांचा समावेश "तहाहयात" वर्गणीदार या वर्गांत होईल.

४ ज्या भक्तांकडून संस्थानचे कोठीफंडांत (चालू खर्चफंडांत) अथवा कायमफंडांत सालीना पांच रुपये किंवा अधिक रक्कम येत असेल त्यांचा समावेश "सामान्य वर्गणीदार" या वर्गांत होईल.

कळावें हे विनंती.

साईभुवन,
१४१, प्रिन्सेस स्ट्रीट,
मुंबई, ता. ३१ मे १९३३.

आपला नम्र सेवक,
**सुंदरराव दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस.

# श्रीसाईबाबा

## मे महिन्याचें शिर्डीवृत्त

मे महिन्यात शिर्डी येथें श्रीसाईबाबामहाराजांच्या दर्शनास ३८ भक्त-जन येऊन गेले. ते जळगांव, शेंदुर्णी–पूर्व व पश्चिमखानदेश, अहमदनगर, बार्शी, येवलें, औंध व भोर संस्थान, सोलापूर, पुणें, नाशिक, अकोला, बुल-ढाणा, तुकीबादाखडी–जि. औरंगाबाद, मुंबई व डाहाणू–जि. ठाणें वगैरे ठिकाणांहून आले होते. त्यांत पार्शी, गुजराती, भोरसंस्थानचे युवराज, सरदार बापूसाहेब विंचूरकर, सरदार आबासाहेब विंचूरकर, जहागिरदार श्रीमंत नानासाहेब मिरीकर, व्यापारी, वकील सरकारी अधिकारी वगैरे मंडळी होती.

ता. ८-५-३३ रोजीं दासगणू महाराज यांनीं श्रीनरसिंहजयंतीचा उत्सव शिर्डी येथें साजरा केला. उत्सवाप्रीत्यर्थ त्यांनीं कीर्तन केलें. शिरा-प्रसाद वांटला व गाईंस चारा घातला. नंतर ते त्या दिवशीं एलीचपुरास गेले व तेथून ते ता. १९-५-३३ ला शिर्डीस परत आले. त्यांनीं आपला मुक्काम ता. ३०-५-३३ रोजीं शिर्डीहून हालवून ते त्या दिवशीं नगरास गेले. तेथें दोनतीन दिवस राहून पुण्यास जाणार आहेत.

ता. ९।५।३३ रोजीं गजानन अनंत जोशी गवई व फिडिलीस्ट औन्ध येथील रहिवासी, यांनीं श्रींच्यापुढें फीड्‌ल्‌वाद्य एक तास उत्तम रीतीनें वाजवून श्रींची सेवा केली.

ता. ११-५-३३ रोजीं पुणें येथील विठ्ठल समाजाचे गुरु श्री. बाबा आळतेकर यांनीं श्रीपुढें गाणें केलें. त्यांजबरोबर काकासाहेब मिरीकर, मुजूम-दार वगैरे मंडळी होती.

ता. २५-५-३३ रोजीं बाबजी प्रिंटिंग प्रेस, जळगांव—पूर्वखानदेशचे श्रीयुत रामकृष्ण नारायण फडणीस हे मुलाचा नवस फेडण्याकरितां श्रींच्या दर्शनास आले होते.

## देणगी वगैरे

१ श्रीयुत रामकृष्ण वेडू रंगारी, भावसार, शेंदुर्णी, ता. जामनेर, पूर्वखानदेश, यांनी शिर्डी येथे संस्थानच्या निधीस आठ आणे दिले.

२ श्रीयुत गणेश गोपाळ देशपांडे, शिरवळकर, गवई, शिर्डी. यांनी संस्थानच्या निधीस आठ आणे दिले.

३ नगर येथील श्रीयुत रासनें यांच्याकडून एप्रिल महिन्यात चार गोणी तांदूळ ( प्रत्येक गोण १५ पायली ) आले. त्यांपैकीं एक गोण श्रीरामनवमी उत्सवाकरितां दासगणूमहाराज यांस दिली. एक गोण गबा सुतार, भगत वगैरे मंडळीस दरसालप्रमाणें वांटली. पैकीं शिल्लक दोन गोणी तांदूळ संस्थानकडे दररोजचे भाताची मुदी श्रीचे नैवेद्याकरितां, शिध्याकरितां वापरण्याकरितां दिल्या.

४ मुंबई–दादर येथील श्रीयुत दादाजी गोपाळ जोशी यांनीं पेट्रोमॅक्स कंदील श्रीद्वारकामाईंत श्रीबाबांच्या तसबिरीजवळ लावण्याकरितां गेल्या महिन्यात दिला होता. आतां तो त्यांच्या इच्छेप्रमाणें रात्रीं दहा वाजेपर्यंत लावलेला ठेवावा, म्हणून त्यांनीं त्याबद्दलच्य तेलाचा खर्च देऊं केला आहे व दर गुरुवारीं श्रीस अभिषेक करण्याचें ठरविलें आहे.

## खुलासा

१ वर्ष १० अंक १ चैत्र १८५५ या महिन्याच्या श्रीसाईलीला अंकांत एप्रिल महिन्याचें शिर्डीवृत्त या सदराखालील पान ३ वरील मजकूराखालीं खामगांव येथील भजनमंडळाबद्दल उल्लेख केला आहे. त्या संस्थेचें नांव हरिकीर्तनालय संस्था असें नांव आहे.

२ सदरहू अंकाचें पान ७ यावरील देणगी जिनसा याच सदराखालील नंबर ४ चा श्रींचा फोटो कु. अमिनबाई गजानन कोठारे, सांताक्रूझ, यांनीं रावबहादुर मोरेश्वर वि. प्रधान यांच्या हस्तें अर्पण केला असें वाचावें.

## भक्तमंडळाची सभा

श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानची बारावी वार्षिक सभा शिर्डी येथें वार्षिक अहवाल, आढावा वगैरे मंजूर करण्याकरितां व इतर कामें करण्याकरितां गुरुपौर्णिमेस ता. ७ जुलई रोजीं भरणार आहे. त्या वेळीं ही संस्थान कमिटीची सभा भरणार आहे.

साईभुवन, १४१ प्रिन्सेस स्ट्रीट;
मुंबई ( २ ) ता. ४ जून १९३३

**सुं. दि. नवलकर,**
ऑ. चिटणीस,
श्रीसाईबाबा शिर्डी-संस्थान.

# श्रीशंकर

## श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईबाबामहाराज, मुक्काम शिर्डी, तालुका कोपरगांव, जिल्हा नगर यांच्या श्रीरामनवमीच्या उत्सवाचा

# अहवाल व जमाखर्चाचा तपशील.

### शके १८५५.

जमा

६।।।०।। सालगुदस्तची शिल्लक ( हाली शिक्का रुपये )

मोंगलाइतील भक्तमंडळीकडून

४५ श्री. परभू विठोबा गंधेवार कोलंबी, जि. नांदेड, निजाम स्टेट.
३५ ,, पापालाल कलाल उमरीकर
१५ ,, धोंडोपंत वकील, नांदेड.
१४ ,, नागोबा बाळुजी वंजारी, उमरी.
१४ ,, नरसिंगा रंगारी, उमरी.
१४ ,, बाबा रंगारी, उमरी.
१४ ,, सायबू सोमठाणकर, उमरी.
११ ,, गोविंद व्यंकटी महाजन, मुखेड.
११ ,, बाबा रामचंद्र पत्तेवार, मुखेड.
११ ,, मारुती पत्तेवार मुखेड.
२ ,, राजेश्वरराव गांजापूरकर.
१ ,, शंकरवणी अतनूरकर.
१० ,, विठ्ठलवाणी उदगीरकर.
२ ,, मल्हा धनगर मुखेड.
५ ,, रंगनाथराव ऊर्फ दादासाहेब वडडकर वकील, हिंगोली.
१ ,, दत्तोपंत सुभेदार, कलमनुरी
५ ,, बंकटलाल मारवाडी, उमरी.
१५ ,, राजेसाहेब देशमुख, माझोड.
२ ,, रामराव हुंडेकरी, नांदेड.

खर्च

३१० श्री. कन्हलाल आनंदराम मारवाडी, शिर्डी, यांस उत्सवाचे सामान साखरपा, तांदूळ, तूप, गूळ, रवा, किरकोळ सामान दिलेल्याबद्दल रोख दिले.

७८ श्री. गोविंद काशीनाथ करबेळकर, पुणें, यांस उत्सवांत पांच दिवस स्वयंपाक केला त्याबद्दल रोख दिले; इसम तीन त्याचा तपशील:-

रु. ४५ रोख स्वयपाक केल्याबद्दल
,, २४ रेल्वेभाडें व गाडीभाड्याबद्दल
,, ५ रु. बक्षिस
,, ४ उपरणे पान एक

७८

५५ श्री. हुसेन सयदूभाई अकोलेकर, दारूवाला यांस शोभेची दारू उडविल्याबद्दल रोख दिले त्याचा तपशील.

रु. ५० दारूबद्दल.
रु. ५ गाडीभाडें.

५५

जमा

२ ,, रघुनाथ पत्तेवार, गव्हाण.
३ ,, नागोराव उंचेगांवकर, कलमनुरी.
७ ,, चिन्नैया तांबोळी, मुखेड.
२ ,, लक्ष्मणराव मुगुटकर, नांदेड.
२ ,, रामचंद्रबाधा पत्तेवार, गव्हाण.
१९ श्री. नागोबा, नारायण, पापालाल, नरसिंगा, बाबा, दादासाहेब वडडकर, गोविंद महाजन, बाबा पत्तेवार, चिन्नैया तांबोळी, बंकटलाल, दासगणू वगैरे मंडळींनीं उपरणें जोडी दिली.
१६ ,, उमरीकर मंडळींनीं द्रोण-पत्रावळी दिल्या.
४ श्री. चंद्रभागाबाई मांजरमकर यांनीं तिखट दिलें.
१ श्री. किसन कोत्तावार.
३ सौ. कृष्णाबाई बाबा पत्तेवार यांनीं तिखट व हळद दिली.
१ ,, अनंत परशराम कावगीकर,
१ ,, विनायक रामराव दिवाळकर.
५१ श्रीमती गिरजाबाई होळकर ऊर्फ ( बनसुडे मासाहेब ), इंदोर.
२५ श्रीमंत भवानराव बनसुडे, महू.
२० ,, कै. नारायणराव गोविंदराव बुळे सरकार, इंदोर.
४० ,, भास्कर रामचंद्र चांदोरकर, सिव्हिल सर्जन, छिंदवाडा.
१८ ,, विनायकराव वैद्य, सबजज्ज, जळगांव. एक डबा तूप दिलें.
१५ ,, विनायक शंकर गिरधर.

खर्च

७४ मोंगलाईतून तूप डबे पांच आले ते खर्च.
३० तूप डबे दोन येथें खरेदी केले त्याबद्दल रोख दिले.
३७॥-॥ उत्सवांत पाच दिवस दूध घेतलें त्याबद्दल रोख दिले.
३५।८॥ उत्सवांत भोजनदक्षिणा-नैवेद्याची दक्षिणा, अभिषेक दक्षिणा, देकार-वगैरेंबद्दल,
३१ शिर्डीच्या व बाहेरगांवच्या मुसलमान लोकांस एकादशीच्या दिवशीं साखरशिऱ्याचें भोजन दिले त्याबद्दल खर्च.
१५ पांच दिवस सर्पण घेतल्याबद्दल रोख दिले; हस्ते विठोबा सुतार, शिर्डी.
२१ श्री. हुसेनभाई सयदूभाई राहतेकर, बँडवाला यांस दिले त्याचा तपशील—
१८ बाजाबद्दल
१ गाडी भाडें.
२ ताशेवाला अहमदभाई यांस
२१
१५ श्री. नारायण महादेव पाळंदे, काशीकर शास्त्री यांस
१० रामायण वांचण्याबद्दल
५ उपरणें पान एक
१५
९ श्री. वासुदेवभट भंडार कवठे, पंढरपुर. यांस
५ अभिषेकाबद्दल दक्षिणा

जमा

१४ ,, बापूराव राघोजी बोरावके, शिर्डी. यांनी १० रु. रोख
४ रु. गूळ
१४

१० ,, वसंतराव गणपतराव कीर्तिकर.
१० ,, छोटालाल भुलाभाई भट.
११ ,, बापूभय्या कोठारी, इंदोर.
११ ,, डॉ. बाळकृष्ण सदाशीव पाटील.
१० ,, आनंदराव पांडुरंग ऊर्फ काका पाटील.
१० ,, श्री. डि. एम्. राजा.
११ ,, जगंनाथमास्तर, राजुरी.
११ ,, लक्ष्मीबाई जोगळेकर, पुणें.
१० ,, रघुनाथ बळवंत आळेकर, इंदूर.
११ ,, नानासाहेब बागडे, नगर.
१२।. ,, काशिनाथ पांडुरंग कुलकर्णी, ठाणे, यांच्यामार्फत:-
१। काशिनाथ पांडुरंग.
१। पार्वतीबाई.
५ छबुताई.
१। गंगाराम.
१। शंकर.
१ रघुनाथ.
१। भिकाजी.
१२।

१५ ,, दत्तात्रय रामचंद्र डोंगरे, अ. कमिशनर, अकोला.
श्री. धोंडोपंत अजिंक्य, डॉक्टर, मुंबई.
,, जनाबाई कोठारी, मुंबई.

खर्च

४ उपरणें पान एक
९

१० श्री. नाना हरी, कोरडे, संगमनेर, यांस आचाऱ्यांना मदत केल्याबद्दल व मुसलमान लोकांचा स्वयंपाक केल्याबद्दल व हनुमान जयंतीचा स्वयंपाक केल्याबद्दल रोख दिले त्याचा तपशील—
३ आचाऱ्यास मदत केल्याबद्दल.
३ पाणी आणल्याबद्दल.
१ मुसलमानांसाठीं स्वयंपाक केल्याबद्दल.
१ हनुमानजयंतीचा स्वयंपाक केल्याबद्दल.
२ उपरणे वर्क्षास एक
१०

१६।-॥ उत्सवांत पांच दिवसांत भोपळा, वांगी, बटाटे, लिंबू वगैरे घेतले त्याबद्दल.

११।≈ उत्सवांत एकादशीच्या दिवशीं टरबूजें, खरबुजें, केळीं वगैरे फळें घेतलीं त्याबद्दल.

४।- बत्तीचे मेंटल, घास, हरभरा, गोडें तेल याबद्दल; हस्तें, बाळा गुरव यांस दिले.

१४।≈॥ उत्सवाचा मांडव घातल्याबद्दल व त्यांस चोपा, काथ्या व झाड-सारवण्याबद्दल दिले; हस्ते रा. बाळा गुरव.

जमा

| | |
|---|---|
| ५ | ,, तुळशीदास खेमजी भाटे, मांटा, ,, कूस. |
| ५ | ,, जनाबाई सीताराम घटे, सोलापूर- |
| ५। | ,, विनायक अप्पाजी वैद्य, अंधेरी. |
| ५ | ,, जनार्दन आत्माराम, माटुंगा. |
| ५ | ,, प्रधान वकील, यावल. |
| ५ | ,, पिरुबाई कोठारी, मुंबई. |
| ५ | ,, त्रिंबक आत्माराम कर्णिक कल्याण. |
| ५॥।≈ | ,, गोपाळराव तळवलकर वकील, उमरावती. |
| ५ | ,, माणीकशा लिंबजीभाई मिस्त्री. |
| ५ | ,, भिकाजी मेहेरवानजी, कारंजा. |
| ५ | ,, रघुनाथ त्रिंबक गिरिधर. |
| ५ | ,, वासुदेव रघुनाथ तळवलकर, डॉक्टर इंदूर. |
| ५ | ,, श्रीकृष्ण पुरुषोत्तम पाटील, अंधेरी. |
| ५ | ,, वामन विठ्ठल दातार वकील, खामगांव. |
| ५ | ,, रामराव बनसुडे, इंदोर. |
| ५ | ,, श्रीकृष्ण नारायण मालवेकर. |
| ५ | ,, नीलकंठ भाऊबड. |
| ५ | ,, गजानन त्रिंबक कर्णीक. |
| ५ | ,, लालसिंग छोटालाल भट. |
| ५ | सौ. सुशिलाबाई गोपाळ दातार, ठाणें. |
| ५ | ,, लक्ष्मीबाई कोल्हटकर, दादर. |
| ५ | ,, आनंदराव होळकर, इंदोर. |
| ५ | ,, बळवंत हरि कर्णीक, वांद्रा. |
| ५। | ,, सदाशिव आत्माराम, मुंबई. |

खर्च

| | |
|---|---|
| १३।≈ | श्री. जव्हारमल्ल मारवाडी, शिर्डी, यांच्याकडून एक डबा तूप खरेदी केलें त्यास रोख दिले. |
| ११॥।- | ,, बाबूरावनाना गोंदकर, शिर्डी यांजकडून तुरीची व हरभऱ्याची डाळ आणली त्याबद्दल रोख दिले. |
| २०॥०॥ | श्री. खुशालचंद मारवाडी, शिर्डी, यांजकडून नारळ आणले व कढईभाडें याबद्दल रोख दिले. |
| ७ | मि. करीमभाई बत्तीवाले यांस बत्त्या लावल्याबद्दल रोख दिले. |
| ८ | शिर्डीच्या मुसलमान लोकांस त्यांच्या रोजच्या नमाज पढण्याच्या मशिदीच्या कम्पाउन्डचा खांब बसविण्यास मदत म्हणून दिले. |
| ६ | श्री. गणेश अनंत सराफ, नांदेड यांस रामनवमीच्या निमंत्रण, पत्रिका एक हजार छापल्या-त्याबद्दल रोख दिले. |
| ३ | श्री. दासगणू यांच्यामार्फत पत्रिका पाठविल्या, त्याचा टपालखर्च. हस्ते श्री. विठ्ठलराव मराठे. |
| ५ | श्री. वामन विठ्ठल दातार, वकील, खामगांव, यांनीं उत्सवांत दशमीच्या दिवशीं कीर्तन केलें त्याबद्दल प्रसाद म्हणून एक नागपुरी उपरणेपान दिलें. |

जमा

| | |
|---|---|
| ५ | ,, रामचंद्र सीताराम देव, अंधेरी. |
| ५ | ,, हरिश्चंद्र रामजी मिस्त्री, अंधेरी. |
| ५ | ,, पांडुरंग नारायण म्हात्रे. |
| ५ | ,, तुकाराम गणेश कोटावार, खामगांव. |
| ५ | ,, ओक वकील, खामगांव. |
| ५ | ,, रावबहादूर कोठारी, खामगांव. |
| ५ | ,, शंकर पांडुरंग पारखे. |
| ५ | ,, दामोदर विनायक गिरधर. |
| ५ | ,, बापूराव तांबोळकर, पंढरपूर. |
| ५ | ,, बाळामहाराज, खामगांव. |
| ५ | ,, शंकर सीताराम कर्णीक, अलीबाग |
| ५ | ,, हरिभाऊ मांडवगणे, अकोला. |
| ५ | ,, (क्ष) इंजीनियर, नाशीक. |
| ५ | श्री. महादेव विष्णु करमरकर. |
| ५ | श्रीमती शांताबाई खंडेराव नावलकर, अंधेरी. |
| ४ | ,, पिरोजबाई कोठारी, मुंबई. |
| ४ | श्री. नारायण भिकाजी रिसबूड, कुलाबा. |
| ३ | ,, अनंत धोंडो खानोलकर, देहू. |
| ४ | श्रीमती शांताबाई जाधव. |
| २ | श्री. दादाजी गोपिनाथ जोशी. |
| २॥- | ,, सावळाराम आत्माराम शिरोडकर. |
| २ | ,, रामचंद्र त्रिंबक कर्णीक, ठाणा. |
| २॥- | ,, दिनकर मोरेश्वर पाटकर. |
| २ | ,, गंगाधर नारायण चौबळ. |
| २ | ,, यशवंत रघुनाथ तेंडुलकर. |
| २ | ,, शंकर नारायण पाटील. |
| २ | श्रीमती पार्वतीबाई पुणेकर. |
| २ | ,, लक्ष्मीबाई गाडगीळ, पुणें. |

खर्च

| | |
|---|---|
| ५ | श्री. ओक वकील, खामगांव यांनी उत्सवांत एकादशीच्या दिवशीं कीर्तन केलें. त्याबद्दल नागपूरी उपरणेपान प्रसाद म्हणून दिलें. |
| ३७॥- | उत्सवांत काम करण्यासाठीं गड्डी व बाया लावल्या. झाडसारवणें वगैरेबद्दल रोख दिले. |
| १६ | उत्सवांत फराळाकरितां लाडू, चिवडा याबद्दल खर्च झाला तो. |
| १२ | द्रोण-पत्रावळी मोंगलाईतून आल्या त्याचा खर्च. |
| ७ | मोंगलाईतून तिखट आले त्याचा खर्च. |
| ८ | केशर, वेदाणा, हिंग वगैरे सामान पुण्याहून लक्ष्मीबाई जोगळेकर यांनीं आणलें त्याबद्दल रोख दिले. |
| ५ | गाडीभाडें कोपरगांवाहून दळण दळून आणल्याबद्दल. |
| ५ | अनाथ विद्यार्थ्यांना मदत, हस्तें हेडमास्तर, मराठी शाळा, शिर्डी. |
| ५७ | श्रीसाईबाबा महाराजाच्या संस्थानांतील नोकरमंडळीस व सेवेकऱ्यांस उत्सवाबद्दल उपरणीं वांटली त्याचा तपशील:— |

४ श्री. नाना पूजारी.
४ ,, नाना चोपदार.
४ ,, बापाजी लक्ष्मण.
४ ,, बाळा शिंपी.
६ ,, बाळा गुरव.

जमा

२ श्री. वामन मोरेश्वर पोतदार, पुणें
२ ,, गांधी रहातेकर यांनीं गूळ ढेप एक दिला
२ ,, दिनकरराव कीर्तिकर, मुंबई
२ ,, द्वारकानाथ सुगवे.
२ ,, विठ्ठल लक्ष्मण सुबंध, पुणें.
२ ,, घनश्याम सीताराम पोतदार.
२ ,, अहिल्याबाई विजयकर.
२ ,, सौ. पार्वतीबाई.
१। श्री. रामचंद्र वामन पाटकर.
१६६।- ,, विठ्ठल लक्ष्मण मोकासी.
१ ,, वासुदेव रामचंद्र.
१ ,, भालचंद्र त्रिंबक कर्णिक.
१। ,, नानासाहेब खासगीवाले, सिंगले.
१।≈ ,, अण्णाजीराव मानोजीराव
१ श्रीमती. जानकीबाई गिरधर.
१ श्री. गोपाळराव भास्करराव दातार.
१ ,, रामभाऊ महाजनि, पुणें.
१ ,, केळकर.
१ ,, नरहर लक्ष्मण मोकासी.
१॥ ,, लक्ष्मीचंद, कानपूर.
१ श्री. शिवराम वासुदेव गोखले, येवला.
१ ,, श्रीमती. शांताबाई मेहेंदळे, पुणें.
१ श्री. गोविंदराव गाडगीळ, पुणें.
१।- ,, एकनाथ विठ्ठल जोशी.
-॥- श्रीमती कमळाबाई गाडगीळ.
१ ,, सीताबाई गाडगीळ
१ ,, पार्वतीबाई काळे
१ श्री. गणेश आत्माराम कानिटकर.
१ ,, विनायक दामोदर कुलकर्णी.
१ ,, बळवंत अप्पाजी जगताप.
१ ,, नाना गोंदकर.

खर्च

२ ,, रंगनाथ गुरव.
२ ,, विशा गुरव.
२ ,, मार्तंड भगत.
२ ,, अण्णा मशिदवाला.
२ ,, गटू शिंदे.
२ ,, महादू फसले.
२ ,, रामा नहावी.
२ ,, तात्या बावके.
२ ,, माणिक ताशेवाला.
२ ,, बयाजी जगताप.
२ ,, रावजी तेली.
२ ,, नारू शेळका.
२ ,, रामगीरबुवा गोसावी.
२ ,, देशपांडे गवईबुवा.
२ ,, अहिल्या.

५७

६ गूळ ढेपा तीन लोकांकडून उत्सवांत आल्या त्या खर्च.

१५॥≈। उत्सवानिमित्त गोरगरीब, आंधळेपांगळे यांना सदरे शिवले त्याबद्दल बाबूलाल मारवाडी यांजकडून कापड घेतलें त्याबद्दल सदरे कोणास शिवले त्यांचीं नांवें.

श्री. दस्तगीर, दोन सदरे.
,, रामचंद्र, ,, ,,
,, दिनकर, एक सदरा.
,, कस्तुरे, ,, ,,
,, दिगंबर, ,, ,,
,, रामा, अनंत, रघुनाथ, अशा या प्रत्येकीं एकेक सदरा.

जमा

१ ,, यजाजी जगताप मास्तर, इंदूर.
१ ,, व्यंकटेश गणेश देशपांडे.
१। श्रीमती काशिबाई पाटलीण.
१। ,, शांताराम बळवंत नाचणें.
१। ,, पांडुरंग विठ्ठल अवगेकर.
१। ,, भिकाजी धोंडू.
१। ,, गंगाराम मोरेश्वर सुगवे.
१ ,, सांईप्रभा मोरेश्वर प्रधान.
१ ,, सांईप्रसाद मोरेश्वर प्रधान.
१ ,, चिंतामण मोरेश्वर प्रधान.
१ ,, नबीबबाई गजानन कोठारी.
१ ,, अमीनबाई गजानन कोठारी.
१। श्रीमती सौ. लीलाबाई विनायक कीर्तिकर.
१ ,, शांताबाई राजे.
१ ,, मनोरमाबाई वैद्य.
१ ,, शंकर अनंत प्रधान.
१४ ,, दासगणूमहाराज यांचे पुढें आलेले.
१७५।~॥ श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड ऊर्फ बाबासाहेब खजिनदार (श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी.) यांच्या मार्फत जी वर्गणी आली तिचा तपशील:—
२ श्री. जोतींद्र रामचंद्र तर्खड.
१ ,, एम्. व्ही चौबळ, चराई-ठाणे.
१। ,, महादेव बापूजी जाधव, कल्याण.
६॥~ ,, डॉ. रंगनाथ नारायण गव्हाणकर, वसई.
३ ,, जनार्दन रामचंद्र दळवी, वसई.
२ ,, यशवंत जनार्दन गाळवणकर, बांद्रा.

खर्च

अनंदा, एक सदरा.
तुळशीराम, एक सदरा.
महार, एक सदरा.
अबदूलभाई यांस अठरा १८ हात कपडा कफनी शिवण्यास व पांघरण्यास दिला, हस्तें बाबूलाल मारवाडी शिर्डी
३॥।•॥ श्री. त्र्यंबकु शिंपी, शिर्डी, यांस सदरे शिवल्याबद्दल शिलाई दिली.
१ श्री. विठोबा सुतार यांस एक रुपया रोख व एक उपरणें पान.
२ ,, अनाजी कुंभार यास एक रुपया व एक उपरणें पान.
२ ,, मध्या नहावी यास एक रुपया रोख व एक उपरणें पान.
२ ,, पुंजा कोळी यास एक रुपया रोख व उपरणें पान.
२॥- मातुळठाणच्या श्रीविठोबास एक उपरणें व आठ आणे दक्षिणा.
१८≡ विड्याचीं पानें घेतलीं त्याबद्दल.
६।~ चर बांधण्यास विटा आणल्याबद्दल.
७॥।~ श्री. खुशालभाऊ मारवाडी यांजकडून नारळ, कापूर, किरकोळ घेतले त्याबद्दल रोख दिले.

जमा

१ ,, विठ्ठल जगन्नाथ खोत, दादर.

१ श्रीमती सौ. सीताबाई राजाराम वाळावलकर, मुंबई.

४ श्री. बाळकृष्ण माधवराव मानकर, वांद्रा.

३ ,, मोरेश्वर नारायण सावे, मुंबई.

३।≈। ,, रामचंद्र आत्माराम तर्खड.

१० ,, दाजी विठ्ठल सांबारे, पार्ले

१ ,, श्रीधर नारायण खारकर ठाणें.

१ ,, महादेव विष्णु चौबाळ, ठाणें.

४ ,, आनंदराव परशुराम डोळस कांदिवली.

२ ,, सिताराम गंगाराम सावंत, मुंबई

१ ,, एन्. बी. राणे, मिरारोड.

१। ,, म. अ. सावंत, मुंबई.

१० ,, डॉ. के. वा. सावे, मुंबई.

१। ,, दत्तात्रय नारायण पाटणकर, वांद्रा.

३ ,, गजानन शिवराम पिटकर, मुंबई

१। ,, गोविंदराव अमृतराव मुळे, माहिम.

श्री. तर्खड यांचेमार्फत आलेली:—

४॥ सौ. सोनाबाई लक्ष्मणराव नाडकर, माहिम

१ श्री. गंगुबाई किन्हीकर, जळगांव

१ ,, यमुनाबाई जोशी जळगांव.

१ ,, मथुबाई गोरे जळगांव

१ ,, दुर्गाबाई देशखंडीकर, जळगांव

१ ,, मथुराबाई वाघ, जळगांव

१ ,, विष्णू शिवराम मेंढकी, जळगांव

१ ,, सदानंद भास्कर कुडाळकर, वांद्रा.

खर्च

२ कपडे धुतल्याबद्दल परटाणीस रोख दिले.

४॥- श्री. भाऊ कुंभार यांस दिले.

५ त्रिंबक तिनपायले यांस भाड्याकरितां दिले.

३॥≈। किरकोळ खर्च

-॥- एक उदबत्ती पुडा आणला; हस्ते सगुण नाईक, शिर्डी.

१ श्री. दासगणू यांच्यामार्फत प्रसाद व उदी रवाना झाली त्याचा टपालखर्च.

२८४≈॥ हनुमानजयंतीच्या दिवशी महार, मांग, भिल्ल, वडारी, यांना गूळ-शिऱ्याचें भोजन दिलें; हस्तें कचरशेट मारवाडी, शिर्डी.

३ हनुमानजयंतीच्या ब्राह्मण भोजनाचा खर्च.

१॥ हनुमानजयंतीच्या दिवशीं नारळ, कापूर, डाळ, यांबद्दल खर्च.

१२॥ श्री. भवानराव बनसुडे हे आपल्या चिरंजीवाचा नवस फेडण्यास आले, तेव्हां त्यांस श्रीतर्फे प्रसादरूपी अहेर करावा लागला त्याबद्दल खर्च.

६१ किरकोळ बिनपावतीचा खर्च

५४॥।≈। बट्टाखातें खर्च; जमेकडील रुपयांपैकीं हल्लीं रुपये ३६८ याचा शें. १५ प्रमाणें बट्टा.

जमा

२ ,, बाळकृष्ण वामन वैद्य, बांद्रा.
५ ,, शंकर विठ्ठल राशिनकर, नगर
१॥≈ ,, शामराव भास्कर कंटक, मुंबई.
२ ,, बाळकृष्ण राघव सावंत, बांद्रा
९ ,, गणपत आत्माराम कीर्तिकर, खार.
२॥ ,, दत्तात्रय मोरेश्वर सबनीस, पार्ले.
२॥ ,, रामचंद्र श्रीपाद कुरतुडकर, मुंबई.
१। ,, चिंतामण रामनाथ सातघरे, बांद्रे.
१ ,, छगलाल कृष्णराव मुरकुटे, मुंबई.
१ ,, आंजर्लेकर, मुंबई
१ सौ. लक्ष्मीदेवी ज्योतिंद्र तर्खड, बांद्रा.
१। सौ. उषादेवी सत्येंद्र तर्खड, बांद्रा.
श्री. तर्खड यांचेमार्फत:—
२॥ ,, मधुसुदन धोंडूजी कांबळी, कै. सदाशिव अण्णाजी मुणगेकर, यांचे स्मरणार्थ चोपडे.
२ ,, श्रीधर गणेश भांडारे, सोलापूर.
१० ,, केशव गणेश आजरेकर, बेळगांव.
२ ,, मंगेश मोरेश्वर पाटकर, मुरबाड.
१। ,, शंकर वासुदेव कुलकर्णी, महु.
२॥ ,, माधव गंगाधर कोराने, बिलीमोरा.
२ ,, पांडुरंग लक्ष्मण भागवत, भुसावळ.
१ ,, लक्ष्मण गोविंद मुंगी, नाशीक.
५ ,, चंद्रकांत बाळकृष्ण मालवणकर, कराची.

खर्च

६७॥।~॥ श्री. सुंदरराव दि. नवलकर, मुंबई. यांच्या मार्फत झालेल्या खर्चाचा तपशील

१॥।~ लेबलें एक हजार, प्रसादासाठीं.
१॥≈ लिफाफे एक हजार निमंत्रणासाठीं
२७ पोस्टेज पाठविण्याबद्दल

३७॥≈॥ प्रसाद रवाना झाला त्याबद्दल

---

६७॥।~॥

४ श्री. ह. भ. प. विश्रामबुवा यांना दिले. त्याचा तपशील:–

२ रु. रोख.
२ उपरणे पान १

---

४

५ अहेराकरितां दोन पागोटीं घेतलीं त्याबद्दल.
९ रामनवमीच्या उत्सवसमाप्तीचा खर्च; ब्राम्हणास दक्षिणा, अभिषेक वगैरे.

---

८५॥।~॥

१०२ पेटीतील जमा द्रगाम्याकरितां दिले; हस्ते तात्या पाटील कोते.

---

१३९२॥।≈। तेराशें ब्याण्णऊ रुपये सव्वा-चौदा आणे एकंदर झालेला खर्च.

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| १। | ,, जनार्दन गोविंद देशपांडे, कराची. | १५८≈ | शिलक पेस्तर उत्सवाकरितां |
| ॥०। | ,, चितळे, कराची. | १४०८८। | |
| ८≈। | ,, धीमल्ल, कराची. | | एकूण चौदाशें आठ रुपये पाव आणा फक्त. |
| ८≈। | ,, चैतन्यमल्ल, कराची. | | |
| २ | सौ. गंगाबाई ओक, कराची. | | |
| १। | ,, रखमाबाई गुरुजी, कराची. | | |
| १। | ,, सीताबाई देशमुख, कराची. | | |
| १। | ,, गंगाबाई लेले, कराची. | | |
| १। | ,, लक्ष्मीबाई टेमकर, कराची. | | |
| १। | ,, गंगाबाई साठे, कराची. | | |
| १। | ,, गंगाबाई देशमुख, कराची. | | |
| १। | ,, काशीबाई पाटील, कराची. | | |
| १। | ,, मालतीबाई गुप्ते, कराची. | | |
| १। | ,, कमळाबाई देसाई, कराची. | | |
| १। | ,, वत्सलाबाई वाक्कर, कराची. | | |
| | श्री. तर्खड यांचेमार्फत:— | | |
| १ | सौ. राधाबाई बागलवाडे, कराची. | | |
| १ | ,, काशीबाई ओक, कराची. | | |
| १ | ,, सीताबाई करमरकर, कराची. | | |
| १ | ,, इंदिराबाई गोखले, कराची. | | |
| १ | ,, निराबाई पवार, कराची. | | |
| १ | ,, सोनूबाई पेन्टा, कराची. | | |
| ‑।≈। | ,, पार्वतीबाई कडेकर, कराची. | | |
| ‑॥‑। | ,, जानकीबाई काणे, कराची. | | |
| ‑।≈। | ,, जानकीबाई जोशी, कराची. | | |
| ‑॥‑। | ,, राधाबाई जोग, कराची. | | |
| ‑॥‑। | ,, जानकीबाई देवधर, कराची. | | |
| ‑।≈। | ,, राधाबाई बराडकर, कराची. | | |
| ‑।≈। | ,, रमाबाई देवधर, कराची. | | |
| ‑॥‑। | ,, लक्ष्मीबाई लागू, कराची. | | |
| ‑।‑ | ,, द्वारकाबाई लागू, कराची. | | |

खर्च

जमा

-।~। सौ. सत्यभामाबाई गुसे, कराची.
-।~। ,, विठाबाई पेडणेकर, कराची.
-॥-। ,, इंदिराबाई वराडकर, कराची.
-।-। ,, माणकबाई वेलणकर, कराची.
-।~। कु. इंदिराबाई तेंडुलकर, कराची.
६≈। ,, यमुनाबाई टिपणीस, कराची.
-।~। श्री. रखमाबाई चव्हाण, कराची.
१। ,, आजीबाई फाटक, कराची.
।॥≈। ,, बहिनीबाई लागू , कराची.
१। ,, सीताबाई हेजीब, कराची.
५ ,, राजुबाई मंद्रा, कराची.
-।~। ,, यमुनाबाई शुक्ल, कराची.
॥≈ ,, नर्सम्माबाई मंद्रा, कराची.
-।~। ,, आनंदीबाई तेंडुलकर, कराची.
५ सौ. यमुनाबाई सखाराम सामंत, शिळोत्तर.
१ श्री. फणसे हस्ते वा. ना. चांदोरकर, कल्याण.
१ पं. रामनारायण भिकाजी, मंडलोई.
१। सौ. रुक्मीणीबाई टेमकर, कराची.
१। ,, भागीरथीबाई टेमकर, कराची.
-॥- ,, लक्ष्मीबाई पवार, कराची.
-॥- ,, रुक्मीणीबाई, कराळे, कराची,
११२॥- श्री. सुंदरराव दि. नवलकर यांच्या हस्ते आलेली जमा.
१। श्रीमती बेनाबाई अजिंक्य, मुंबई.
२ ,, दामोदर गणेश देसाई, मुंबई.
१ ,, द्वारकाबाई वासुदेव तळपदे, मुंबई.
५ श्री. डी. एन्. राजे, लोणावळें.
२ ,, जी. आर. दाभोळकर, अहमदाबाद.
१ ,, पांडुरंग हरिश्चंद्र महाडिक, केळवे.
१ ,, मोरेश्वर विष्णु जोशी, डंबरगांव,

जमा खर्च

२ श्री. यशवंत राजाराम जुन्नरकर,
धरमपूर.
२ ,, विष्णु बळवंत पितळे, पार्ला.
१ ,, रमाकांत नारायण प्रधान, मुंबई.
३। ,, गोवर्धन माधव विजयकर.
-॥- ,, नानीबाई प्रभाकर.
१। ,, आनंदराव बा. व्यवहारकर
मुंबई.
५ ,, बी. के. चव्हाण, पालघर.
१। ,, पुतळाबाइ ग.विजयकर,पालघर.
१ ,, रामकृष्ण नाना वगळ, मुंबई.
१। ,, गणपतराव मोरेश्वर कोठारे,
मुंबई.
१। सौ. चंपुबाई ग. कोठारी.
१। श्री. श्रीकृष्ण ग. कोठारी.
२। श्रीमती बाबलीबाई सुंदरराव,
नवलकर.
१ श्री. सदानंद विनायक तळपदे.
१ ,, हरि कृष्ण करंदीकर, इटार्सी.
२ ,, जयराम कल्याण शुद्ध उंबरगांव.
५ श्रीमती काशीबाई कानिटकर, नगर.
१॥। ,, ए. एफ. तवाडिया, मुंबई.
१। श्री. शंकरराव हरिनारायण
विजयकर, मुंबई.
१। ,, दत्ताराम आनंदराव पितळे.
मुंबई.
४ ,, रंगनाथ नारायण गवाणकर,
वसई.
२ सौ. सरस्वतीबाई जी. कोठारी,
ग्वाल्हेर.
१। श्री. सुंदरराव दि. नवलकर, मुंबई.
१। श्रीमती शांताबाई सुं.नवलकर,मुंबई.

जमा खर्च

१। श्री. आनंदराव गणपतरांव तळपदे वांद्रा.
३ ,, त्रिंबकराव रामचंद्र आवटे, देवास.
५ ,, डी. एल. आजरेकर, पुणें.
२ ,, के. ए. वेंदरे, कर्जत.
-॥- श्रीमती वहिनीबाई शामराव प्रभाकर, मुंबई.
१। श्री. मोतीराम ग. प्रभाकर,
२ ,, शांताबाई मह्मांडकर.
२ ,, लिलावती.
१। श्री. आनंदराव रामचंद्र बडवे, पुणें.
२ ,, के. व्ही. कीसन आणि कं., बोरिवली.
१। ,, हरिभाऊ बापूराव शिरसाठे.
२ ,, खंडेराव के. चोणकर, मुंबई.
१। ,, गोविंद वि. मोडक, कल्याण.
५ ,, गोपाळ पिलाजी उगलव, सोलापूर.
५ ,, ए. एम्. पौडवाल, मुंबई.
५। ,, भाई अबाजी भिलाड.
२ ,, दत्तात्रय यशवंत ठाकूर, फोंडाघाट.
१ श्री. विनायक दाजी भावे, ठाणें.
१। ,, दत्तात्रय गणेश वैद्य.
५ ,, आत्माराम लांडोबा आरोळकर.
१३०६॥ एकंदर जमा रक्कम रुपये.
१०२ श्रीसांईबाबांच्या पेटींतील उत्सवाच्या पांच दिवसांत निघाली ती.
१४०८॥ एकुण चौदाशें आठ रुपये पाव आणा फक्त.

तन्द । पूर्वाभिमुख होऊनी ॥ २०५ ॥ रामनाम जपून त्रिवार । त्यागिलें त्यांनीं शरीर । दुःखित झाले नारीनर । हृदय पिटूं लागले ॥ २०६ ॥ गेला गेला हो कुबेर । गेला राजयोगी साचार । चालता-बोलता परमेश्वर । आह्मालागीं दुरावला ॥ २०७ ॥ गेला जीवींचा विसांवा । गेला अनाथांचा ठेवा । विझाला आमुचा ज्ञानदिवा । कालरूपी वाऱ्यानें ॥ २०८ ॥ चैत्र शुद्ध एकादशी । रविवार होता ते दिवशीं । सूर्योदयाचे समयासी । महाराज गेले निजधामा ॥ २०९ ॥ संवत अठराशें अडुसष्टांत । चैत्रमास ऋतु वसंत । उबंरखेडें ग्रामांत । समाधिस्त जाहले ॥ २१० ॥ मिरवणूक कलेवराची । काढिली मग थाटाची । स्वारी सार्वभौमाची । निघे जैशी तैशापरी ॥ २११ ॥ टाळ मृदंग वाजती झांजा । जयजय साधु महाराजा । भक्त गर्जती करून चीजा । दणदणती नगारे ॥ २१२ ॥ भूमीची करून शुद्धि । स्वामीस दिधली समाधि । तया उबंरखेड्यामधीं । श्रीएेनाथासन्निध ॥ २१३ ॥ वस्त्र-समाधी खंदारीं । केली असे साजिरी । भास्करभाऊ गादीवरी । बैसले त्यांच्या मागून ॥ २१४॥ त्यास मुलें दोन । रुक्मांगदराय जाण । यांत झाले विराजमान । रुक्मांगद गादीवरी॥२१५॥ तीन पुत्र रुक्मांगदास । यशवंत सदाशिव देवीदास । गणपतीनामें रायजीस । एक पुत्र जाहला ॥२१६॥ यशवंतस्वामीचे पुत्रद्वय । हनुमंत आणि दत्तात्रय । हल्लीं गादीवर पात्य । पुत्र हनुमंतस्वामीचा ॥२१७॥ धुंडिराज नाम त्याचें । लेंकरूं लहान वयाचें । करी रक्षण तयाचें । सच्चिदानंदपरमात्मा ॥२१८॥ हा वंशवृक्ष समर्थांचा । वर्णिला मीं येथ साचा । रज मी त्यांच्या पदींचा । करोत रक्षण ते माझें ॥२१९॥ हे साधुचरित्र त्रयाध्यायीं । जे भावें पठतील पाहीं। त्यांची पाठी शेषशायी । निजांगें रक्षील सर्वदा ॥२२०॥ या चरित्रीं धरितां भाव । पुरवील मनींचे हेतु सर्व । येथें जो धरील

गर्व । तो बुडेल सर्वस्वी ॥२२१॥ हे साधुमहाराज समर्था । पुण्यवंता परम-पवित्रा । धरून लेंकराच्या हाता । भवनदीच्या पार न्यावें ॥२२२॥ स्वति श्रीसंतकथामृत । अगाध साधुमहाराज चरित । त्यांतून बोलिलों किंचित । आदरा म्हणे दासगणू ॥२२३॥ श्री हरिहरार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥

॥ इति द्वादशोऽध्यायः समाप्तः ॥

# अध्याय १३

श्रीगणेशायनमः । हे विघ्नकंदना मयूरेश्वरा । कृपासिंधु लंबोदरा । शूर्पकर्णा अघमलहरा । सिंदुरारे पाव मसी ॥ १ ॥ आतां श्रोते सावचित्त । हा संतकथामृतनामें ग्रंथ । साक्षात् ऋतुवसंत । कोकिळ व्हा रे अवघे ॥२॥ हे अध्यायीं कथा अद्भुत । वर्ण्य विषय श्रीशुकानंदी नाथ । बुद्धिदाता रमाकांत । सर्व सत्तातयाचि ॥ ३ ॥ महाराष्ट्राचे दक्षिणेस । कृष्णेचिया उत्तरेस । भालकी चिडगुप्पी ग्रामास । शुकानंद जन्मले ॥ ४ ॥ या भालकी ग्रामीचा । होता भिक्षुक वृत्तीचा । द्विज तैत्तिरीय शाखेचा । कौन्डिण्य गोत्री उमापती ॥ ५ ॥ कृष्णानामें त्याची वधू । दुजी कौसल्या वा कयाधु : महा पतिव्रता अगाधु । पंचकन्यासमान ॥ ६ ॥ या सतीचे उदरास । महाराज आले जन्मास । ये विषयींचा इतिहास ! ऐका सांगतों थोडका ॥ ७ ॥ पूर्वी राधाकृष्ण एकांतीं। करीत होते सुखद रती । तें पाहिलें सहजगती । भक्तश्रेष्ठ सुदाम्यानें ॥ ८ ॥ त्यायोगें राधेसी । कोप आला बहुवसी । तिनें शापिलें सुदाम्यासी । क्रोधाविष्ट होऊंनियां ॥ ९ ॥ सात वेळां भूमिवरी । तूं जन्म घेशील निर्धारीं । निर्विकल्प तोंवरी । मुक्तिसुख न मिळे ॥ १० ॥ ऐशी ऐकतां शापवाणी । सुदामा खिन्न झाला मनीं । तें पाहून चक्रपाणी । उत्‌शाप देता जाहला ॥११ ॥ हे माझ्या भक्तवरा । सोडों नको किमपि धीरा । या जन्ममरण येरझारा । सुखद होतील तुजलागीं ॥ १२ ॥ तूं माझा परम भक्त । मीही भक्तप्रिय परमनाथ । तुझ्यासाठीं जन्माप्रत । मीही येतों सात वेळां ॥ १३ ॥ जन्मोजन्मी तुजप्रति । घडेल माझी संगती । सातवे जन्मीं तुजप्रती । मिळेल मुक्ति निश्चयें ॥१४॥ ऐसा पूर्वीचा वृत्तांत । रामकृष्णें केला ग्रथित । श्रीगुरुपरंपरा ग्रंथांत । गीर्वाण

भाषेमाझारीं ॥ १५ ॥ उमापतीस मुलें दोन । भालचंद्र विनायक जाण । जैसे राम आणि लक्ष्मण । पुत्र अयोध्यापतीचे ॥ १६ ॥ हा विनायक पूर्वीचा । श्री सुदामा होय साचा । प्राणमित्र कृष्णाचा । भक्तांमाजीं अग्रेसर ॥१७॥ विनायकाची विरक्तवृत्ती । बाळपणींच निश्चिती । कळून मातापित्याप्रती । आली होती श्रोतेहो ॥१८॥ गरीबी उमापतीची । अनिवार होती साची । संगती सद्भक्ताची । नावडते लक्ष्मीला ॥ १९ ॥ विनायकाची बुद्धि तैल । चित्त जैसें गंगाजळ । वा मौक्तिक निर्मळ । शिवासम होय हो ॥२०॥ बाळपणापासून । प्राणायामादि साधन । नाना मुद्रा आसनें जाण । करी विनायक एकांतीं ॥२१॥ गंगानामें तयाप्रति । कांता लाधली महासती । परी विनायकाची चित्तवृत्ति । प्रपंचांत लागेना ॥२२॥ एकांतीं बसे सर्वकाळ । करीं घेऊनियां माळ । तें पाहून शोकाकुल । आप्त अवघे जाहले ॥२३॥ काय करावें या पोरा । हा टाळकुट्या निघेल खरा । हे श्यामसुंदर रमावरा । सुबुद्धि या देईंजे ॥२४ ॥ असो विनायकें एके दिनीं । कुलदेवतेस वंदोनी । गमन केलें काननीं । तप कराया कारणें ॥२५॥ प्रथम केली तीर्थयात्रा । पुनीत कराया गात्रा । त्या पुण्यवंता परम पवित्रा । नमन माझें अष्टांगीं ॥ २६ ॥ नंतर आले सह्याद्रिसीं । शुक नामें तिर्थासी । जेथें शुक्राचार्य तपासी । पूर्वकालीं बैसले ॥१७॥ आधींच सह्याद्री गिरिवर । परम रम्य मनोहर । नाना जाती तरुवर । ओघ जलाचे ठायीं ठायीं ॥२८॥ अश्वत्थवट औदुंबर । साल तमाल मांदार । आम्र आंमली जंबीर । खदिर चाफा कृष्णागरु ॥२९॥ ताडमाडादि पोफळी । देवदारु रान केळी । अशोकपलाश कर्दळी । कपित्थ हदगा शेवगा ॥३०॥ बिल्व निर्गुडी पारिजात । बकुल आवळी निंबसत्य । वन्य तरु अरण्यांत । वर्णितां नये पार कधीं ॥३१॥ करवंद बोरी बाभाटी । निबिड कुंजांची जेथ दाटी । नाना लतानीं वृक्ष

कंठीं। पिठ्या मारिल्या श्रोते हो ॥३२॥ तृणरूपी शालूहरित। नेसली वाटे मेदिनी जेथ। गोखरूंचीं पुष्पें पीत। बुट्टे वाटती त्यावरी ॥३३॥ पर्वताचे तुटले कडे। भयंकर वेडेवांकुडे। नळनील वानर माकडें। उड्या मारिती बहुसाल ॥३४॥ व्याघ्र अस्वल केसरी। गज गेंडे नानापरि। रानसूकर महिष भारी। मस्त विचरती काननांत ॥३५॥ कोल्हे लांडगे आणि रोही। तरसा उदा पार नाहीं। मृग समुदाय ठायीं ठायीं। नव दूर्वांकुर सेवित ॥३६॥ खगसमूह वृक्षावर। हंस चातक मयूर। चंडोल रावे सुंदर। भरद्वाज कोकिला ॥३७॥ गण्या गिधाडें दिवाभीत। वागूळ पिंगळे अगणित। टिटव्या काग साळ्या सत्य। रोले आणि वालुका ॥३८॥ घोण नानेटी मण्यार। मांडूळ धामिणी अजगर। डोम्या नाग फणिवर। फूत्कार जेथें टाकिती ॥३९॥ ऐसा भयंकर काननीं। विनायकवसले तपासनीं। प्राणायाम करुनी। लाविते झाले समाधी ॥४०॥ षण्मास समाधी लावून। बैसती अन्नपाण्यावीण। तरुवराचीं गलित पर्णें। वाळलीं सेविती षण्मास ॥४१॥ निवास केला कंदरींत। स्थान परम एकांत। मृगजिनाचें आसन तेथ। घेतलें त्यानीं बसावया ॥४२॥ पुढें मासोत्तम माघमासीं। तिथी वद्य चतुर्दशी। महापर्वणी शिवरात्रीसी। काय घडलें तें ऐका ॥४३॥ रात्र झाली दोन प्रहर। तमानें भरलें अंबर। कृष्ण वसन साचार। रजनी वाटे नेसली ॥४४॥ किरं ऐसा शोकध्वनी। पती वियोगें करी रजनी। कर्णकटु घूघूध्वनी। उलूक करूं लागले ॥४५॥ ऐशा त्या घोर रजनीसी। बैसूनियां विमानासी। तया पुनित स्थानासी। एक यक्षिणी पातली ॥४६॥ यक्षिणी परम सुंदर। कुरळकेश मस्तकावर। कांचनापरी वर्ण गौर। अधरोष्ठीं बिंबाधरी ॥४७॥ पूजापात्र कांचनाचें। गंधपुष्पांनीं युक्त साचें। त्यांतील दिव्य कमळांचें। काय वर्णन करावें ॥४८॥ तिनें पाहतां विनायक। मनीं

झाली साशंक । ह्मणे हा तर देहधारक । कोण प्राणी ये ठायीं ॥४९॥ अंगकांती सतेज । जैसा सूर्य दिनराज । धरणीसही येईल लाज । पाहून याच्या शांतीला ॥५०॥ जैसे वसिष्ठ पाराशर । वा ध्रुवव्यासु कुमार । तैसाच हा योगीवर । भासत आहे ये ठायीं ॥५१॥ वा शुक्राचार्य ये स्थानीं । बैसले पुन्हा तपाचरणीं । मानवाच्यानें ऐशा वनीं । न राहावेल कदापि ॥५२॥ मी याचे समोर । उभी पद्मीण सुंदर । मज पाहून तिळभर । आसन याचें ढळेना ॥५३॥ यावरून हा कोणी तरी । खचित असावा अवतारी । पतितोद्धारा भूमीवरी । स्वेच्छेनें जन्मला ॥५४॥ कांहीं असो यालागून । केलें पाहिजे वंदन । ऐसें यक्षिणी बोलून । जोडिती झाली पाणीद्वया ॥ ५५ ॥ तेधवां हस्तसंकेतें । विनायक झाले विचारिते । तूं कोण कोठील कां येथें । सांग आलीस ये वेळां ॥५६॥ यक्षिणी ह्मणे योगीवरा । ऐका आतां माझी गिरा । यक्ष लोकीं वास खरा । आहे माझा यक्षिणी मी ॥ ५७ ॥ आज महाशिवरात्री । म्हणून आलें भूमीवरती । दर्शन घ्याया निश्चिती । सर्व जोतिर्लिंगांचें ॥५८॥ हिमकेदार विश्वनाथ । महाकाळ कालातीत । श्रीओंकार उमानाथ । रेवातटविहारी ॥५९॥ श्रीसोमनाथ सोरटी । वंदून आलें महाराष्ट्रीं । श्रीघृणेश्वर धूर्जटी । दारुका वनीं नागनाथ ॥६०॥ गौतमी गोदास्वर्धनी । निर्माण झाली जेथून । तो भोळानाथ शूलपाणी । त्र्यंबकराजा वंदिला ॥६१॥ वैजनाथ सर्वेश्वर । महाभीम भयंकर । परमात्मा भीमाशंकर । मल्लिकाअर्जुन शैलशिरीं ॥६२॥ तीर्थराजा महासागर । तया तटीं रामेश्वर । जेथें सीतापती रघुवीर । आला जावया लंकेतें ॥६३॥ त्या अवघ्यांचें वंदन । योगीवरा मी केलें जाण । प्राणलिंग श्रीगोकर्ण । पुजून आलें ये ठायीं ॥६४॥ हें माझ्या सद्गुरुचें । स्थान शुक्राचार्यांचें । म्हणून ये स्थळाचें । आलें दर्शन घ्यावया

॥६५॥ आमुचें करिती पूजन । हें मुनिवरा कामी जन । मनकामना धरून । ऐहिक सुखें भोगण्याची ॥ ६६ ॥ आमुचिये प्राप्तीचे । चवदा मंत्र असती साचे । साधन करावया यक्षिणीचें । ते लागती अवश्य ॥६७॥ ते मी अवघें सांगतें । योगीवरा आज तूतें । ध्यान माझ्या विनंतीतें । देई माझ्या योगीवरा ॥६८॥ मी माझ्या गुरुस्थानीं । तुम्हां पाहिलें आज नयनीं । म्हणून माझे येथूनी । गुरु आपण जाहलां ॥६९॥ शुक ऐसे आपण । करा नामधारण । यक्षिणी ऐसें बोलोन । मंत्र शिकविती जाहली ॥ ७० ॥ यक्षिणी प्रसन्न झाली जरी । परि जो न परवा करीं । सच्चिदानंद श्रीहरी । हृदय संकटीं सांठविला ॥ ७१ ॥ याचें नांव सत्पुरुष । क्षमा शांतीचे जे कोश । अबाढव्य जगतास । ईश्वर रूप मानिती ॥ ७३ ॥ मुखें ओंकार बीज जपती । नासाग्रा दृष्टि लाविती । अंतर्दृष्ट महामती । शुकानंद महाराज ॥७४॥ असो पौषमासीं सूर्यग्रहण । आलें अमवास्येसी जाण । त्या निमित्तें बहुत जन । आले तीर्थस्नानासी ॥७५॥ तों देखिलें एकंदरींत । श्रीशुकानंदनाथ । विस्मय वाटला जनाप्रत । तेज त्यांचें पाहोनी ॥७६॥ त्यांनीं प्रार्थना नानापरी । केलिया या ग्रामांतरीं । शुकानंदास साजिरी । परि न झाला उपयोग ॥७७॥ हळोपाळी पसरली मात । कीं शुकतीर्थीं एक महंत । महावैराग्य कडकडीत येवोनियां राहिला ॥ ७८ ॥ निरिच्छेचा प्रत्यक्ष पुतळा । तपो तेजें जैसी चपळा । सच्चिदानंद जगत्पाळा-।वीण कोणा न जाणे तो ॥ ७९ ॥ असो श्रोते त्याच दिवशीं । अस्तमानीचे समयासी । श्रीललितादेवी काननासी । येती झाली भक्तास्तव ॥८०॥ सुवासिनीचा वेश धरला । रूप सुंदर अभिनवबाळा । पाहोनी जीच्या मुखेंदूला । रोहिणीवर लाजतसे ॥ ८१ ॥ दृष्टी पाल्या मृगीपरी । हंसगमना बिंबाधरी । गोठ पाटल्या तोडे करीं । रूप रंभेसमान ॥ ८२ ॥ ललिता शुकानंदासी । बोलती झाली परियेसी

आज सूर्यपर्वणीसी । ललितापूजन करावें ॥ ८३ ॥ त्याचें आहे पुण्य बहुत । प्रत्यक्ष भेटे रमानाथ । चाल माझिया सदनाप्रत । पूजन कराया ललितेचें ॥८४॥ माझें सदन येथूनी । जवळ आहे काननीं । तें आपुल्या चरणांनीं । पवित्र करा योगीवरा ॥८५॥ ऐसें ऐकून तद्भाषण । महाराज वदती हांसून । या वनाची असे पूर्ण । माहिती विमले मज-लागीं ॥ ८६ ॥ हें निबिडतर कांतार । येथें न कोणाचें मंदिर । मोठ-मोठ्या भयंकर । दर्‍या दृष्टीस पडताती ॥ ८७ ॥ ऐसें असतां मजप्रत । कां सांगते असत्य । ललिता ह्मणे हें न खचित । चाल मंदिर दावितें ॥ ८८ ॥ ऐसें बोलोन उभयतां । चालूं लागलीं तत्त्वतां । ललि-तेची अगाध-सत्ता । निर्माण केलें मंदिर ॥ ८९ ॥ रत्नखचित ज्याच्या भिंती । प्रति वैकुंठ निश्चिती । ठायीं ठायीं रत्नजोति । जळल्या त्या मंदि-रांत ॥ ९० ॥ स्फटिकमय चौक ज्याचे । तुळया खांब सुवर्णाचे । थवे सुवासिनींचे । बंगईवर बैसलेत ॥ ९१ ॥ कोणी रसाळ गीता गाती । कोणी फुगड्या खेळती । कोणी निजांगा उटण्या लाविती । थंडगार चंदनाच्या ॥ ९२ ॥ कोणी गुंफिती पुष्पमाळा । कोणी मुठींत गुलालाला । घेऊन एकमेकींला । पाहोन फेंकती अंगावर ॥९३॥ ऐसें पाहोन रम्य स्थान । शुकानंदनाथाचें मन । गेलें असे आनंदोन । कौतुकें पाहत चहूंकडे ॥९४॥ ललितामहाराज येतां सदनीं । उठल्या अवघ्या सुवासिनी । तबकीं दीप ठेवूनी । ओंवाळिले समर्थाला ॥९५॥ शुकानंदा लागून । घातिलें त्यांनीं मंगल स्नान । पूजासाहित्य करोन । त्याचेसाठीं ठेविलें ॥९६॥ त्या ठायीं श्रीयंत्र । दिधलें ललितेनें त्याप्रत । पहा साधूचें केवढें सत्व । साह्यकरी जगदंबा ॥९७॥ मग त्या श्रीयंत्रावरी । जगदंबा ललिता ईश्वरी । प्रगट होवून बसली खरी । आपुल्या भक्ताकारणें ॥९८॥ बटु झाला गजानन । मयूरेश्वर दयाघन । सांग ललिता पूजन । घडलें असें समर्थासी ॥ ९९ ॥

प्रार्थनापूर्वक नमस्कार । केला देवीस अखेर । तैं ईश्वरी वरद कर । ठेवून ललिता बोलली ॥ १०० ॥ हे श्रीशुकानंदनाथा परम पवित्र मदीय भक्ता । मी प्रसन्न तुज भक्ता । अपेक्षीत वर मागें ॥ १०१ ॥ महाराज ह्मणती ते अवसरीं । हे प्रणवरूप ईश्वरी । आदि माये सर्वांग-सुंदरी । तुझ्या दर्शनें कृतार्थ मी ॥ १०२ ॥ हाच द्यावा मजला वर । येणें भेटेल शारंगधर । सच्चिदानंद सर्वेश्वर । वैकुंठवासी परमात्मा ॥ १०३ ॥ स्वस्वरूपीं माझें मन । सदा व्हावें अवघें लीन । चुको माझें जन्ममरण । ठाव मिळो हरिपदीं ॥ १०४ ॥ ऐसें ऐकतां तद्भाषण । अंबा आनंदली पूर्ण । चहूं भुजीं कवटाळून । हृदयीं धरिलें तयाला ॥ १०५ ॥ हे माझ्या शुकानंदा । तूं पाहशील गोविन्दा । श्यामसुंदरा आनंदकंदा । चिंता मनीं करूं नको ॥ १०६ ॥ प्रकार ईश्वरप्राप्तीचे । बहुत कथिलें शास्त्रीं साचे । परी फळ अवघ्यांचें । एकचि जाण शुकानंदा ॥ १०७ ॥ जैशा एक गांवासी । वाटा अनेक यावयासी । तैसेच ईशपदासी । जाया मार्ग अनेक ॥ १०८ ॥ मार्ग ईश्वरप्राप्तीचे । संप्रदाय नाम त्याचें । भेद अनेक तयांचे । किती सांगूं तुजप्रती ॥ १०९ ॥ आनंद चैतन्य सरस्वती । माध्व नामा निश्चिती । रामदासी शैव निगुती । शाक्त जातक लिंगाईत ॥ ११० ॥ तुझा उमापति पिता । आनंद सांप्रदायी तत्त्वतां । तूंही जावें त्याच पंथा । अनुलक्षून मोक्षातें ॥ १११ ॥ त्या आनंदसांप्रदायीं । शिव भक्ति एक पाहीं । या सांप्रदाया पायीं । महत्त्व अथर्वीण वेदाचें ॥ ११२ ॥ घरीं त्वरित जाय आतां । दीक्षा घेईं तत्वतां । उमापती जो तुझा पिता । त्याजपासून साक्षेपें ॥ ११३ ॥ तुझे वृद्ध मातापिता । तैसाच भालचंद्र भ्राता । गंगा नामें तुझी कांता । दुःखित आहे तुझ्यामुळें ॥ ११४ ॥ वरदहस्त तुझे शिरीं । माझा जाण निर्धारीं । मल्लिकार्जुनीं त्रिपुरारी ।

वंदून जावें गृहातें ॥ ११५ ॥ एक मासपर्यंत । वास करीं बत्सा येथ । माहीशिवरात्रीनिमित्त । त्वां जावें मल्लिकार्जुना ॥ ११६ ॥ ऐसें बोलून नारायणी । अंतर्धान झाली तेथुनी । शुकानंद पूर्वस्थानीं । येवूनिय बैसले ॥ ११७ ॥ पुढें कांहीं दिवसांनीं । येता झाला तया स्थानीं । रणधुरंधर चूडामणी । परशुराम पटवर्धन ॥ ११८ ॥ पूर्वी परशुराम अवतारा । निःक्षत्रिय केली धरा । तैसीच ज्यानें यवन भारा । पासून भूमि सोडविली ॥११९॥ जो तेथींचा भूपती । येता झाला तया प्रांतीं । त्यासी लोक सांगती । वृत्त शुकानंदाचें ॥१२०॥ तें ऐकून भाऊसी । आश्चर्य वाटलें मानसीं । ह्मणें ऐशा साधुसी । जाऊन पहावें अवश्य ॥१२१॥ गांव बारा हजाराचा । जहागीर देईन त्यास साचा । ऐसा संत ईश्वराचा । साक्षात् अंश असावा ॥ १२२ ॥ बाहून एका सरदारासी । सांगितलें तयासी । जाऊन सांगा समर्थासी । मी येतो दर्शना ॥ १२३ ॥ तें ऐकून सरदार । गेला शुक तीर्थावर । जोडून आपुले दोन्ही कर । वंदन करी शुकानंद ॥ १२४ ॥ म्हणे हे समर्थ योगीवरा । समाधी न लावा जरा । आपणा जहागीर देण्या खरा । भूप येती ये ठायीं ॥ १२५ ॥ गांव बारा हजाराचा । मिळत आहे तुम्हास साचा । सरदार परशुरामभाऊचा । भाव जडला तुमच्या पदीं ॥ १२६ ॥ ऐसें ऐकतां तद्भाषण । महाराजांचे दोन्ही नयन । पूर्ण दुखःश्रु करून । वरती पाहूं लागले ॥ १२७ ॥ तें पाहतां सरदारासी । ऐसें वाटलें मानसीं । जहागीर मिळते म्हणून यासी आनंद ऐसा जाहला ॥ १२८ ॥ आनंदाश्रु वरोन । भरून आले दोन्ही नयन । जरी न करी हा भाषण । परी मी इंगित जाणतें ॥ १२९ ॥ ऐसें बोलोन निघाला । तात्काळ गडाखालीं आला । ज्ञान अंधचक्षूला । कोठोनी असे श्रोते हो ॥ १३० ॥ इकडे महाराज ईश्वरासी । विनविते झाले परियेसी । हे सच्चिदानंदा हृषी

## वर्गणीदारांकरितां

१ श्रीसाईलीलेचा वर्षारंभ चैत्र महिन्याचे अंकापासून आहे. नवीन वर्गणीदारांस वर्षारंभापासून अंक घ्यावे लागतील.

२ पत्ता बदलणें झाल्यास लगेच आम्हांस कळवावें. बदललेला पत्ता न कळविल्यामुळें कित्येक वेळां अंक गहाळ होतात.

३ अंकासंबंधीं पत्रव्यवहार आमचेकडे करावा.

४ लेखासंबंधीं पत्रव्यवहार संपादक व प्रकाशकांकडे करावा.

## वार्षिक वर्गणी.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनिऑर्डरनें अगाऊ रु. ३।≈, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।≈, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

व्यवस्थापक—**श्रीसाईलीला.**

## लेखकांकरितां

१. श्रीसाईलीलेंत प्रसिद्धीसाठीं पाठविलेला लेख अथवा कविता कागदाच्या एका बाजूवर, मार्जिन सोडून, सुवाच्य बाळबोध लिपींत असावी. पेन्सिलीनें किंवा कागदाचे दोन्हीं बाजूस लिहिलेला मजकूर छापण्यास फार त्रास पडतो.

२. लिखाणासोबत पूर्ण नांव व पत्ता दिला पाहिजे. नांव प्रसिद्ध न करितां टोपण नांवाखालीं प्रसिद्धि द्यावयाची असल्यास त्याप्रमाणें कळवावें.

३. लेख अथवा कविता हातीं आल्यानंतर १ महिन्यांत पसंति अगर नापसंति कळविली जाईल. पसंति कळविल्यानंतर, आम्हांस कळविल्याशिवाय लेखकांनीं तो मजकूर दुसरीकडे छापविण्यास देऊं नये.

४. लेखांत योग्य तो फेरफार करण्याचा अधिकार आमचेकडे राहील. येईल तसा शब्दशः प्रसिद्ध करण्याची हमी आम्हीं घेत नाहीं.

५. लेखासोबत पुरेसें पोस्टेज आल्यास, नापसंत लेख परत करूं.

प्रकाशक—**श्रीसाईलीला.**

"दक्षिणा प्राइझ कमिटीनें बक्षिस दिलेला व केसरी, चित्रमयजगत्, ज्ञानप्रकाश, विविधज्ञानविस्तार, व रत्नाकर वगैरे वृत्तपत्रें व मासिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिलेला असा संतकवि ह. भ. प. श्री दासगणू महाराज यांनीं नवीन रचिलेला व प्रोफेसर श्री. नी. चाफेकर, M. A., LL. B. यांनीं प्रस्तावना लिहिलेला नवीन ग्रंथ

**श्री पासष्टी-भावार्थ दीपिका**

हा **नरेंद्र बुक डेपो दादर,** मुंबई येथें मिळेल.

**कापडी प्रत १० आणे. साधी प्रत ८ आणे.**

**सर्व प्रकारचे मेंदूचे विकारांवर जागरण व मानसिक श्रम करणाऱ्यांस अत्यंत उपयोगी**

नकलेबद्दल ] **ब्राह्मी तेल** [ सावध राहावें.

**बाळबाळंतिणीकरितां औषधें**

**बाळंत काढा नं. १** पहिल्या दहा दिवसांचा ०।१४; **बाळंत काढा नं. २** दहा दिवसानंतर ०।१४; **बाळकडू:**—मूल जन्मल्यापासून देण्यास योग्य ०।८; **कुमारी आसव** लहान मुलांकरितां ०।१२.

**सतत २५ वर्षें लोकादरास पात्र झालेलें, कोणत्याही ऋतूंत घेण्यास योग्य, अत्यंत मधुर व आरोग्यदायक**

एक रत्तल १।०।० ) **द्राक्षासव** ( अर्धा रत्तल ०।१४
दीड रत्तल २।०।० ट. ख. वे. नि.

शिवाय आमचे कारखान्यांत टिकाऊ तयार काढे, आसवें, अरिष्टें, भस्में वगैरे ५०० वर औषधें तयार आहेत. त्यांचे माहितीचा मोठा क्याटलाग व प्रकृतिमान भरून पाठविण्याकरितां "रुग्ण-पत्रिका" हीं सात आण्यांचीं तिकिटें आलीं असतां पाठवूं.

**दत्तात्रय कृष्ण सांडू ब्रदर्स** आर्यौषधी कारखाना, चेंबूर जि. ठाणें.

टे. नं. ८७०२४ X २२२७८. दुकान दवाखाना, ठाकुरद्वार, **मुंबई** नं० २

पुणें:—**श्री साईनाथ** आणि **कंपनी.**

हें पुस्तक श्रीलक्ष्मीनारायण छापखाना, ३६४ ठाकुरद्वार, मुंबई येथें **अनंत आत्माराम मोरमकर** यांनीं छापून **दा. आ. तर्खड** यांनीं ५ सेंट मार्टिन्स रोड, वांद्रें येथें प्रसिद्ध केलें.